Estd. 1962
A++ Accredited by
NAAC (2021) With
CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA**
**PHONE : EPABX - 2609089**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र**
**दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९०८९ (संलग्नता विभाग - २६०९०८९, ९१३६)**
Website : www.unishivaji.ac.in e-mail : affiliationt1@unishivaji.ac.in

**जा.क्र. शिवाजी विद्यापीठ/संलग्नता टी.१/प्रशांत/०००४३** **दिनांक : ०१/०२/२०२२**

प्रति,

मा. अधिविभाग प्रमुख,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये/शिक्षण संस्था

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या सत्रारंभ व सत्रसमाप्तीसंदर्भात.**

संदर्भ : १) या कार्यालयाचे जा.क्र. शिवाजी विद्यापीठ/संलग्नता टी.१/प्रशांत/२४३०/०००६ दि. ५.१.२०२२ व जा.क्र. शिवाजी विद्यापीठ/संलग्नता टी.१/प्रशांत/२४३१/०००७ दि. ५.१.२०२२ चे परिपत्रक.
२) जा.क्र. आस्थापना/२०२ दि. २८/०१/२०२२ चे परिपत्रक.

**महोदय,**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील सत्रारंभ व सत्रसमाप्तीसंदर्भात वरील संदर्भ क्र. १ अन्वये कळविण्यात आले आहे. तसेच वरील संदर्भ क्र. २ अन्वये दिनांक १ फेब्रुवारी, २०२२ पासून सर्व महाविद्यालयातील व अधिविभागातील नियमित वर्ग हे ऑफलाईन पध्दतीने सुरु करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची उपस्थिती ही १०० टक्के अथवा कमी याबाबत आपल्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत व त्याचा अनुपालन अहवाल संलग्नता विभागास/आस्थापना विभागाकडे पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे. शासनाच्या दि. ७ जानेवारी, २०२२ च्या परिपत्रकानुसार प्रत्यक्ष उपस्थितीस प्रतिबंध करण्यात आला होता. सदरचा प्रतिबंध शिथिल करुन प्रत्यक्ष उपस्थितीत अध्यापन करण्यास दि. २५/१/२०२२ च्या पत्रान्वये अनुमती देण्यात आल्याने उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये कळविण्यात आले आहे. **त्यामुळे ज्या अभ्यासक्रमांचे सध्या अध्यापन सुरु आहे त्या वर्गातील अध्यापन प्रत्यक्ष उपस्थितीत करता येईल.** तसेच प्रथम सत्रांच्या दिनांक २४/०१/२०२२ ते ०२/०३/२०२२ या कालावधीत आयोजित केलेल्या परीक्षा या विद्यापीठाकडून ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने दिनांक ५/१/२०२२ च्या परिपत्रकांमध्ये कोणतेही बदल नसल्याने वरील संदर्भ क्र. १ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

**( डॉ. व्ही. एन. शिंदे )**
**प्रभारी कुलसचिव**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर